# जाहीर नोटीस
## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील आस्थापना विभाग, वित्त विभाग, न्याय विभाग व अभिलेख कक्ष येथे खाली नमुद केलेल्या संगणक टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व तदनुषंगाने दुरुस्तीसाठी आवश्यक वस्तु बसविणेकरिता सन २०२६–२०२७ करीता वार्षिक करार करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | वस्तुचा तपशील | दर प्रतिनग रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | कॅनॉन (७१ ए, ३२६, ३३७, ७७ ए, ७७, ७१) | एच.पी. (८८ ए) | क्योसेरा |
| १ | कॉम्प्युटर लेझर प्रिंटरचे टोनर कार्ट्रेज रिफिलींग | | | |
| २ | मॅग्नेटीक रोलर | | | |
| ३ | ड्रम | | | |
| ४ | पी.सी.आर. | | | |
| ५ | डॉक्टर ब्लेड | | | |
| ६ | वायफर ब्लेड | | | |
| ७ | चिप | | | |

तरी ज्या कोणाला वर नमुद वस्तू या जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील आस्थापना विभाग, वित्त विभाग, न्याय विभाग व अभिलेख कक्ष येथे योग्य दरात उधारीने पुरविणे व लेझर प्रिंटर व क्योसेरा टोनर कार्ट्रेज रिफिलिंग करुन देणे शक्य असेल त्यांनी निविदा खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून दहा दिवसांचे आत म्हणजेच १६/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह व तारखेसह मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे, त्यामध्ये कर व वस्तूंची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात, तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटर हेडवर GST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील आस्थापना विभाग, वित्त विभाग, न्याय विभाग व अभिलेख कक्ष येथील **कॅनॉन (७१ ए, ३२६, ३३७, ७७ ए, ७७, ७१), एच.पी. (८८ ए) व क्योसेरा** टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व दुरुस्ती बाबतचा करार सन २०२६ – २०२७ चे आर्थिक वर्षामध्ये करणेत येणार आहे.

३. टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व दुरुस्तीबाबत तक्रार दिलेनंतर त्वरीत न्यायालयात हजर होवून तक्रारीचे निवारण करावयाचे आहे.

४. तक्रार निवारण करणेसाठी प्रशिक्षीत तज्ञाला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्याला टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व दुरुस्तीबाबतचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. जेव्हा सर्व तक्रारीचे निवारण होईल तेव्हाच टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व दुरुस्तीचा खर्च देणेत येईल. सदरचा खर्च हा कार्यालयासाठी पुरविणेत आलेला निधी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा देणेत येईल.

६. जर आपणाशी केलेला वार्षिक देखभाल करार हा समाधानकारक नसेल तर सदर वार्षिक देखभाल करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

७. वार्षिक देखभाल कराराचा खर्च हा प्रत्येक महीन्याला आपण सादर करणेत आलेल्या देयकानंतर अदा करणेत येईल. तसेच टोनर कार्ट्रेज रिफिलिंग व दुरुस्तीसाठी आगावू खर्च देण्यात येणार नाही.

८. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

९. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे

१०. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. ०७/०३/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
सत्यमेव जयते
डिस्ट्रीक्ट कोर्ट, रत्नागिरी

**दिनांक— ०७/०३/२०२६.**

**प्रभारी प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.**

म.जा.क्र. वित्त/ ९५३५/२०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दि. ०७/०३/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दी करिता:—</u>**

१.सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.